# एक कॉल, प्रॉब्लेम सॉल्व्ह !

## अजितदादांना कॉल गेला | पंढरपुरात ए बी फॉर्म घेऊन थेट गाडी आली !

- निष्ठावंत कार्यकर्त्यांनं सुटकेचा नि:श्वास सोडला
- कार्यकर्ता सांभाळण्याच्या हातोटीचा राज्यभर गेला संदेश

सोलापूर/प्रतिनिधी

**संवेदनशील नेता आपल्या निष्ठावंत आणि सच्च्या कार्यकर्त्यासाठी काय करु शकतो, निर्णायक वळणावर नेत्यांनी दिलेला हात किती भारी ठरु शकतो, असा किस्सा पंढरपूर तालुक्यात घडला असून त्याची चर्चा संपूर्ण तालुकाभर सुरु आहे. इतकेच काय तर अत्यंत परखड आणि स्पष्टवादी असणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कार्यकर्ता संभाळण्याच्या हातोटीचा आदर्श किंबहुना तसा संदेश महाराष्ट्रभर गेला.**

त्याचे झाले असे की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पंढरपूर तालुक्यातील निष्ठावंत हणमंत पवार यांच्या पत्नीने गोपाळपूर गटातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, त्यांना शेवटच्या दिवसापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसचा एबी फॉर्म मिळाला नव्हता, पंढरपुरात ज्यांच्याकडे अधिकार होते, त्यांनीही हात वर केले, त्यामुळे पवार हे ए बी फॉर्मच्या पार्श्वभूमीवर, शेवटच्या क्षणी अत्यंत अडचणीत आले. पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या अनुषंगाने, त्यांची उमेदवारी धोक्यात आली. ते अस्वस्थ झाले. पुढच्या क्षणी त्यांनी गॉडफादर आणि पक्षाचे सर्वे सर्वा थेट अजित दादांना फोन लावला. ए बी फॉर्मसाठी जे काही झालं, त्याबद्दल अजित पवारांच्या लक्षात आलं. त्यांनी तातडीने गाडीने पंढरपुरात ए बी फार्म पाठवला.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितींची निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्रितपणे लढविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पक्षाला किती फायदा होतो, हे निकालानंतर दिसून येईल. मात्र, राष्ट्रवादीतील फुटीनंतर दोन्ही पवारांशी निष्ठेने राहणाऱ्या अनेकांचा मोठी अडचण झाली आहे. त्यातून अनेकांवर अन्याय होत असल्याचे झेडपी आणि पंचायत समिती निवडणुकीच्या दरम्यान दिसून येत आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पंढरपूर तालुक्यातील निष्ठावंत म्हणून हणमंत पवार यांची ओळख आहे. त्यांची पत्नी सुनीता पवार यांनी गोपाळपूर जिल्हा परिषद गटातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस उजाडला तरी सुनीता पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसचा अधिकृत एबी फॉर्म मिळाला नव्हता.

### निर्धारीत वेळ ए बी फॉर्म आला अन् छतामधील धडधड थांबली

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ज्यांच्याकडे एबी फॉर्म दिले होते. त्यांच्याकडेही हणमंत पवार यांनी मागणी केली. मात्र, त्यांनीही ऐनवेळी हात वर केले. शेवटी हणमंत पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. अजित पवारांनी सच्चा कार्यकर्त्यासाठी खास गाडी पाठवून एबी फार्म पाठवून दिला. पवार यांना गुरुवारी दुपारच्या निर्धारित वेळेआधी राष्ट्रवादी काँग्रेसचा एबी फॉर्म मिळाला. त्यानंतर त्यांनी तो एबी फॉर्म उमेदवारी अर्जासोबत जोडला. उमदेवारी अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीत ए बी फॉर्म येणार की नाही, अजित पवार राष्ट्रवादी पक्षाची आपली उमेदवारी राहणार की नाही, या धास्तीनं हणमंत पवारांची छातीचे ठोके वाढले होते. धडधड वाढली होती. मात्र उमेदवारीच्या निर्धारित वेळेत ए बी फॉर्म आला आणि पवारांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. छातीमधील धडधड थांबली.



---

## स्वीकृत नगरसेवक पदाला आतापासूनच लॉबिंग सुरु

- मार्चमध्ये होणार निवडी
- शहर भाजप कार्यालयात ५० पेक्षा जास्त अर्ज

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकांची निवड मार्च महिन्यात होणार आहे. मात्र त्यासाठी आतापासूनच इच्छुकांनी लॉबींग सुरू केले आहे. शहर भाजप कार्यालयात मोठ्या प्रमाणात विनंती अर्ज प्राप्त होत आहेत.आतापर्यंत ५० ते ६० अर्ज प्राप्त झाल्याची माहिती आहे.

महापालिका निवडणुकीत उमेदवारी वाटपावरून भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात नाट्य घडले होते. त्यांनतर स्वीकृत नगरसेवक पदासाठीही भाजपात अनेक नाट्यमय घडामोडी घडण्याच्या शक्यता वर्तविण्यात येत आहेत. त्यामुळे स्वीकृत नगरसेवक निवडी या शहर भाजपासाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. वास्तविक पाहता या निवडी फेब्रुवारी पंधरवड्यानंतर किंवा मार्च महिन्याच्या सुरूवातीला होणार आहेत. मात्र आतापासूनच त्यासाठी इच्छुकांनी लॉबिंग सुरू केले आहे. सोलापूर महापालिकेत दहा स्वीकृत नगरसेवक घेण्याचे अधिकार मिळणार आहेत. यात भाजपाच्या वाटेला ९ नगरसेवक येणार आहेत. यात आपली वर्णी लागावी यासाठी अनेकांनी फिल्डिंग लावली आहे. निवडणुकीत जे उमेदवार पराभूत झाले, त्यांना स्वीकृत नगरसेवक पदासाठी संधी देण्यात येणार नसल्याचे शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी स्पष्ट केले आहे. असे असले तरीही राभूत झालेल्या अनेक उमेदवारांनीही स्वीकृत नगरसेवक पदासाठी पक्षाकडे अर्ज केले आहेत. काही इच्छुकांनी थेट पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे हे अर्ज केले आहेत तर काहींनी शहरातील तिन्ही आमदारांकडे स्वीकृत नगरसेवक पदाची इच्छा व्यक्त केली आहे.

### विविध समाजाकडूनही मागणी

स्वीकृत सदस्यपदी निवड व्हावी यासाठी आता समाजानेही आग्रह धरला आहे. मारवाडी समाज, जैन समाजानेही आपल्या समाजाला प्रतिनिधीत्व द्यावे, अशी मागणी केली आहे. याशिवाय लोधी समाजाही एका स्वीकृत नगरसेवकासाठी आग्रह धरत आहे.

### निवडीबाबत उत्सुकता

भाजपाकडून ९ स्वीकृत नगरसेवक होणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार तिन्ही आमदार आणि पालकमत्र्यांचा यासाठी कोटा ठरला आहे. त्यामुळे कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता आहे.

---



## करमाळा : २९८ अर्ज पात्र

करमाळा : जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी करमाळा तहसील कार्यालयात अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी २९८ अर्ज पात्र राहिले आहेत.

बुधवारी दुपारी तीन वाजेपर्यंत जिल्हा परिषदेच्या सहा गट आणि बारा पंचायत समिती गणांतून एकूण ३०८ अर्ज दाखल झाले होते. या अर्जांची छाननी प्रक्रिया गुरुवारी सायंकाळी उशिरापर्यंत पार पडली. छाननी नंतर एकूण अर्जांपैकी जिल्हा परिषदेचे चार तर पंचायत समितींचे सहा असे एकूण दहा अर्ज अपात्र ठरले. त्यामुळे जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणनातून एकूण २०८ पात्र अर्ज राहिले आहेत अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल कारंडे यांनी दिली आहे. अर्ज मागे घेण्यासाठी दिनांक २७ ही शेवटची तारीख त्यादिवशी दुपारी ३ नंतर चित्र स्पष्ट होणार आहे.

---

## राज्यातील २९ महापालिकांमधील महापौरपदाचे आरक्षण

मुंबई : मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत ही सोडत काढण्यात आली. एकूण २९ महापालिकांपैकी १७ ठिकाणी खुला प्रवर्ग, ८ ठिकाणी ओबीसी, ३ ठिकाणी अनुसूचित जाती आणि एका ठिकाणी अनुसूचित जमातीसाठी आरक्षण निश्चित झाले आहे.

**१. खुला प्रवर्ग - १७ शहरे**

या प्रवर्गातून कोणताही नगरसेवक महापौर बनू शकतो. मात्र, काही ठिकाणी महिला आरक्षण असल्याने तिथे चुरस वाढली आहे.

**महानगरे:** मुंबई (महिला), नवी मुंबई (महिला), पुणे (महिला), छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, पिंपरी चिंचवड (महिला).

**इतर शहरे:** अमरावती, भिवंडी (महिला), वसई-विरार, मीरा भाईंदर (महिला), मालेगाव (महिला), परभणी, सोलापूर, नांदेड (महिला), धुळे (महिला), सांगली.



**२. ओबीसी प्रवर्ग** - ८ शहरे - यातील ४ ठिकाणी महिलांसाठी विशेष आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**जळगाव:** ओबीसी (महिला), चंद्रपूर: ओबीसी (महिला), अहिल्यानगर (अहमदनगर): ओबीसी (महिला), अकोला: ओबीसी (महिला), इचलकरंजी: ओबीसी (सर्वसाधारण), कोल्हापूर: ओबीसी (सर्वसाधारण), पनवेल: ओबीसी (सर्वसाधारण).

**उल्हासनगर:** ओबीसी (सर्वसाधारण).

**३. अनुसूचित जाती** - ३ शहरे जालना: अनुसूचित जाती (महिला),

**लातूर:** अनुसूचित जाती (महिला).

ठाणे: अनुसूचित जाती (सर्वसाधारण).

**४. अनुसूचित जमाती**- १ शहर - कल्याण-डोंबिवली: अनुसूचित जमाती (सर्वसाधारण).

---

## कोल्हापुरात भाजपकडून महापौरपदासाठी विजयसिंह देसाई, विजयसिंह खाडे रेसमध्ये

कोल्हापूर : कोल्हापूर मनपात महापौरपदासाठी ओबीसी प्रवर्गातून आरक्षण निश्चित झालं आहे. त्यामुळे या प्रवर्गातून भाजप कोणाला संधी देणार? याची उत्सुकता आहे. गेल्या २० वर्षात प्रथमच कोल्हापूर महापालिकेमध्ये प्रथमच महापौर ओबीसी प्रवर्गातून होणार आहे. त्यामुळे कोणाला संधी दिली जाणार? याकडे लक्ष असेल.

कोल्हापूरमध्ये महायुतीने काठावरचे बहुमत मिळवलं आहे. कोल्हापूरमध्ये भाजप महायुतीमध्ये सर्वात मोठा पक्ष ठरला असून २६ जागा मिळाल्या आहेत. शिवसेना शिंदे गटाला १५ जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला चार जागा मिळाल्या आहेत, तर जनसुराज पक्षाचा एक नगरसेवक निवडून आला आहे.

दुसरीकडे, कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये काँग्रेस विरोधात असला तरी सर्वात मोठा पक्ष आहे. काँग्रेसला ३४ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे आता महायुतीमध्ये बिघाड झाला नाही तर निश्चितच भाजपचाच पहिला महापौर कोल्हापुरात होऊ शकतो. ओबीसी आरक्षण निश्चित झाल्याने भाजपकडील सात ते आठ नगरसेवकांपैकी कोणाला संधी मिळणार याची उत्सुकता आहे. कोल्हापूरमध्ये विजयसिंह खाडे आणि विजयसिंह देसाई ही दोन नावे सध्या आघाडीवर आहेत. विजयसिंह देसाई सर्वाधिक मतांनी विजयी झाले आहेत. विजयसिंह देसाई यांनी प्रभाग क्रमांक ९ मधून नगरसेवक आहेत. विजयसिंह देसाई शहरासह जिल्ह्यात परिचयातील नाव आहे. त्याांचं संघटन पक्षासाठी जमेची बाजू आहे. संधी मिळाल्यास आपली छाप सोडू शकतात. विशेष म्हणजे विजयसिंह देसाई यांनी ओबीसी प्रवर्गातूनच मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला आहे.

---

# सोलापूर भाजपा स्ट्राईक रेटमध्ये अव्वल

## पश्चिम महाराष्ट्रात भाजपाची ऐतिहासिक कामगिरी

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापुरात शत प्रतिशतचा नारा प्रत्यक्षात आणत भाजपने ऐतिहासिक कामगिरी केली. यंदा भाजपने विकासाच्या करत मुद्यांबरोबरच फोडाफोडी, विरोधकांची ताकद खालसा पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक स्ट्राईक रेटने सोलापूर महापालिकेत कमळ फुलविले. भाजप स्थापन झाल्यानंतर पहिले नगरसेवक आणि सत्ताही पश्चिम महाराष्ट्रातील सोलापुरातूनच आली होती. १०२ जागा लढवून ८७ जागेवर विजय संपादन केला आहे. स्ट्राईक रेटमध्ये सोलापूर भाजपा अव्वल ठरली आहे.

१९८५ मध्ये पुलोद आघाडीचा प्रयोग करुन भाजपचे ११ नगरसेवक निवडून आले. किशोर देशपांडे पहिले महापौर बनले. त्यानंतर सन २०१७ ते २०२२ या कालावधीत शोभा बनशेट्टी, श्रीकांचना यन्नम हे महापौर बनले. आता पुन्हा चौथा महापौर हा भाजपच्या चिन्हावर निवडून आलेला उमेदवार होणार आहे. सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी आणि काँग्रेसचा गड होता. पुणे, पिंपरी चिंचवडही पवार कुटुंबाचा गड. परंतु त्याला छेद देण्याच्या प्रयत्नात भाजप यशस्वी झाला. पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, सांगली, मिरज, कुपवाड या पाच महापालिकेत निवडुन येण्यात भाजपच्या उमेदवारांचा स्ट्राईक रेटमध्ये सोलापुरात सर्वाधिक आहे.



सोलापुरात भाजपाच्या १०२ - ८७, कोल्हापुरात ८१पैकी २६, पुण्यात १६५ पैकी १९९, पिंपरी चिंचवडमध्ये १२८ पौकी ८४ तर सांगली-मिरज-कुपवाड्मध्ये ७८ पैकी ३९ जागेवर भाजपाने विजय मिळवला आहे. यात सोलापूरचा स्ट्राईकरेट जास्त आहे.

भाजप यंदा फोडाफोडीच्या रणनीतीतून शत प्रतिशत यश मिळविण्यात सरस ठरले. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिंदेसेना, एमआयएम या पक्षांतील अनेक मातब्बरांना भाजपमध्ये खेचून उमेदवारी दिली. मागील साठ वर्षांपासून महापालिकेत कोठे परिवाराचे वर्चस्व राहिले आहे. यंदा कोठे परिवाराची ताकद भाजपच्या सोबतीला राहिल्याने ८७ आकडा गाठणे शक्य झाले. सन २०१७ सालीच्या महापालिका निवडणुकित शिवसेना आणि राष्ट्रवादी एकसंध होते. परंतु या दोन्ही पक्षांत फुट पडल्याने पक्षाची ताकद दुभंगली. राष्ट्रवादीचेही दोन गट पडल्याने मतदार विभागले. तर काँग्रेसला शहरात सक्षम नेतृत्व नसल्याने अनेकांनी सोडचिट्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अनेक मुस्लिम समाजातील लोकांना सोबत घेतले. राष्ट्रवादी अजित पवार गटाने शिंदे सेनेसोबत युती केली. त्यातून हिंदुत्ववादी मते ही भाजपकडे वळली.

### भाजप श्रेष्ठींच होते बारीक लक्ष

नगरपालिका निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाल्याने पक्षश्रेष्ठींनी महापालिका निवडणुकीवर लक्ष्य केंद्रीत केले होते. आ. विजयकुमार देशमुख आणि आ. सुभाष देशमुख हे निष्ठावंतांना उमेदवारी न दिल्याने नाराज होते. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी लक्ष घालून शहर उत्तर, दक्षिण, मध्यमध्ये पूर्वीपासून काम करत असलेल्या भाजपच्या उमेदवारांना तिकीट मिळवून देण्यात बाजी मारत निवडूनही आणले.

---

## सांगोला तालुक्यात जि.प.चे १२९ अर्ज वैध

सांगोला : जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत गुरूवारी अर्जांची छाननी होऊन जिल्हा परिषदेच्या सात गटातील १४१ अर्जापैकी १२ अर्ज अवैध तर १२९ अर्ज वैध ठरले. पंचायत समितीच्या १४ गणातील १९७ अर्जापैकी १९ अर्ज अवैध तर १८८ अर्ज वैध ठरले आहेत. एकूण ३१ अवैध तर ३०७ वैध अर्ज ठरलल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर. माळी सहाय्यक तथा तहसीलदार बाळू भागवत यांनी दिली

जिल्हा परिषद महूद गटातील ज्ञानेश्वर येडगे, नितीन गोडसे, जवळा गटातील रवींद्र ठोकळे, चंद्रकिशोर पवार, बाबासाहेब बंडगर, कडलास गटातील वनिता पवार, शोभा काटे, चोपडी गटातील नंदकुमार शिंदे, असलम मुलानी, संतोष काळे, कोळा गटातील संभाजी सरगर यांचे अर्ज अवैध ठरले आहेत तर एकतपूर घेरडी गटात निरंक आहे.

पंचायत समितीच्या महूद गणातील राजश्री सावंत, वाकी शिवणे गणातील तृप्ती गोडसे, रूपाली पांढरे, एकतपुर गणातील ज्ञानेश्वर पवार, वाडेगाव गणातील सावित्रा जावीर, संयोजा वाघमारे, जवळा गणातील उज्वला झाडबुके व अर्चना पाटील, अजनाळे गावातील माणिक वाघमारे, राघू ऐवळे, राजुरी गणातील प्रभावती वलेकर, चोपडी गणातील शिवाजी बाबर, दत्तात्रेय लवटे सुरेश बाबर, घेरडी गणातील सोनाली सावंत, भाऊसाहेब यमगर, विद्या लवटे यांचे अर्ज अवैध ठरले आहेत तर चिकमहुद, कडलास कोळा हातीद सोनंद येथे निरंक आहे छाननी प्रसंगी निवडणूक निरीक्षक आनंद करमाने, निवडणूक अधिकारी बी आर माळी, सहाय्यक तथा तहसीलदार बाळू भागवत नोडल अधिकारी मिलिंद सावंत व सर्व राजकीय पक्षांचे व अपक्ष उमेदवार उपस्थित होते.